समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व विकसन

# युवोन्मेष

सौर श्रावण शके १९४३

**‘नेतृत्व’ विषयाला वाहिलेले युवागटासाठीचे प्रायोगिक अंक!**

नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

## राष्ट्रीय एकात्मता विशेषांक

भाग - ३



# अंतरंग...

## भाग १, २, व ३ मधील सामायिक लेख

### भाग १


- **लेख**
  - ✻ हार्मनी अर्थात संवादिता!!
  - ✻ Gyansetu Visit to Jammu
- **QR Codes**
  - ✻ ब्रिगेडियर अभय भट यांचा संदेश
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Arunachal Pradesh)


### भाग २


- **लेख**
  - ✻ National Integration A Citizen's Perspective.
  - ✻ ज्ञानसेतूच्या माध्यमातून प्रवास करताना
- **QR Codes**
  - ✻ भारतीय लष्कर प्रमुख जनरल मनोज नरवणे यांचा संदेश
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Madhya Pradesh)

**संवाद** ...................................... १

**हितगुज** ................................. ३


### भाग ३


- **लेख**
  - ✻ **Education - The Pathway to Leadership and National Integration** ...................... ५
  - ✻ ईशान्य भारतातील एक वर्ष................ ११
- **QR Codes**
  - ✻ Video of Lt. Gen. S. S. Hasabnis (Retd.) ... १०
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Meghalaya) ......................... १६



तुमच्या प्रतिसादाच्या प्रतिक्षेत...

संपर्क - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी,

दूरभाष - ०२०-२४२०७१७९

yuvonmesh@gmail.com

WhatsApp No. - ९६३७३१७०६१



| संपादक | अतिथी संपादक | अक्षरजुळणी |
| --- | --- | --- |
| महेन्द्र सेठिया | पूर्वा दीक्षित-धोकटे | सुप्रिया कुलकर्णी |

प्रकाशन दिनांक

राष्ट्रीय सौर श्रावण-भाद्रपद शके १९४३/ऑगस्ट२०२१

## संवाद

नमस्कार मित्र-मैत्रिणींनो,

युवोन्मेष च्या माध्यमातून तुमच्याशी बोलायची संधी मिळाल्याचा आनंद वाटतो आहे. युवोन्मेषचा हा राष्ट्रीय एकात्मता विशेषांक आहे आणि हा अंक भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रकाशित होतो आहे याबद्दल विशेष आनंद वाटतो आहे!

स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षात आपण एका बाजूला आपल्या इतिहासाकडे बघून शिकायचे तर दुसरीकडे त्यातील चांगल्या-वाईट परंपरा समजून घेत भविष्याचा वेध घ्यायचा! या दोन्ही प्रक्रिया एकत्र करत असताना, 'आपण नक्की कोण? आपली संस्कृती, आपला समाज आणि त्यातल्या विचारधारा कोणत्या?' याचा शोध घेणे क्रमप्राप्त आहेच, पण त्यासोबतच आधुनिक जगतातील  समाजरचना, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, पर्यावरणीय बदल यांचा अभ्यासही आपल्याला करावा लागेल. या दोन्हीच्या अभ्यासातून पुढच्या काळात राष्ट्रीय एकात्मतेसाठी पूरक, पोषक घटक कोणते हे आपल्याला सापडेल. असे घटक शोधणे, त्यावर कामाला सुरुवात करणे आणि अशा कामासाठी गट उभा करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेसाठी नेतृत्व करणे.

अशा नेतृत्वाचे एक उदाहरण म्हणून ज्ञान प्रबोधिनी मध्ये २०१३ पासून ज्ञानसेतू हा प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पातून विज्ञानाचे माध्यम वापरून राष्ट्रीय एकात्मतेसाठी संपर्काचे काम नित्य चालू आहे. यातून आपण आत्तापर्यंत ८ राज्यांमध्ये ५५० कार्यकर्त्यांच्या मदतीने १०९० कार्यशाळांच्या माध्यमातून ५५००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवीत आहोत.

त्यामुळेच या अंकाच्या संपादनाची जबाबदारी ज्ञानसेतूच्या गटाने घेतली. त्यातून ज्ञानसेतू गटाचे अनुभव, शिकलेल्या गोष्टी आपल्या सर्वांपर्यंत पोहोचवत आहोत.

ज्ञानसेतूच्या दौऱ्यांमध्ये सहभागी कार्यकर्त्यांचे अनुभव नक्की कसे होते, ते काय काय शिकले, त्यांनी या अनुभवांकडे कसे पाहिले या संदर्भातले प्रातिनिधिक लेख तुम्हाला या अंकांमध्ये वाचायला मिळणार आहेत आणि मला आशा आहे हे लेख वाचून, 'असे अनुभव आपण घेतले पाहिजेत' असे वाटेल. या सगळ्या कामामागची भूमिका समजून घेतली तर असे काम करण्याची प्रेरणा वाढत जाते असा माझा अनुभव आहे. मा. प्रशांत दिवेकर (भाग १ मध्ये) व मा. एअर वाईस मार्शल (निवृत्त) किरण पळसुले (भाग २ मध्ये) यांच्या लेखांमधून

सुद्धा भूमिका स्पष्ट व्हायला नक्की मदत होईल.

१०–१५ दिवस जाऊन कार्यशाळा घेतानाचे अविस्मरणीय अनुभव ठरवून वर्षभर मणिपूर सारख्या राज्यात जाऊन राहाणं तिथे काम करणं हा साहसी अनुभव देखील तुम्हाला वाचायला मिळेल.

राष्ट्रीय एकात्मतेविषयी प्रबोधिनीच्या भूमिकेतील काही पैलू या अंकातील विविध भागातील चौकटींमध्ये तुम्हाला वाचायला मिळतील, विचार करायला उद्युक्त करतील.

या अंकाचे अजून एक वैशिष्ट्य मला आवर्जून सांगावेसे वाटते ते म्हणजे तर लेखांबरोबर दिलेल्या लिंक्सच्या माध्यमातून ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देत आहोत. ही मेजवानी आपल्याला मिळावी यासाठी हे आपलाच ज्ञानसेतूचा कार्यकर्ता आशुतोष भुजबळ याने विशेष प्रयत्न घेतले त्याचे मी आभार मानते.

गेलं वर्षभर चालू असणाऱ्या 'ज्ञानसेतू कट्टा' मालिके मधील "Know our country" या उपक्रमांमधल्या वेगवेगळ्या राज्यातील स्थानिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती, तिथले प्रश्न, अनुभव समजून घेऊया. ते ऐकून त्याच्या खाली दिलेली प्रश्नावली नक्की सोडवा.

हा अंक एकूण तीन भागांमध्ये १५, २२ आणि २९ ऑगस्ट या तारखांना आपल्यापर्यंत पोहोचणार आहे. या 'युवोन्मेष'च्या अंक निर्मितीच्या प्रवासात माझा या विषयावर बराच अभ्यास झाला, चर्चा झाल्या. त्यासाठी मला सौगंधदादा आणि आशुतोषदादा बारमुख यांचे विशेष आभार मानावेसे वाटतात. या प्रयत्नाबद्दल तुमचे अभिप्राय आणि प्रतिक्रिया समजून घ्यायला नक्की आवडतील.

**तुमचीच,**

**पूर्वाताई**

(gyansetu@jnanaprabodhini.org)

९८८१७६१४८८

ज्ञान-सेतु

Connecting through knowledge exchange

A Project by Jnana Prabodhini

**ज्ञानसेतू या उपक्रमाबद्दल अधिक माहितीसाठी शेजारील लिंकवर क्लिक करा आणि व्हिडीओ पाहा.**

प्रिय युवा प्रबोधकांनो,

येत्या वर्षात 'युवोन्मेष'चे ५ अंक प्रकाशित करण्याचा संकल्प आपण केला आहे. त्यातील पहिला, 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांक' तुमच्यापर्यंत पोहोचवताना आनंद होत आहे. नेतृत्व संवर्धन केंद्रातील आजी-माजी विद्यार्थी व ज्ञान प्रबोधिनीच्या युवाशक्ती प्रबोधन कार्यदिशेतील युवक-युवतींचे गट यांच्या संयुक्त प्रयत्नातून यावर्षीचे अंक प्रकाशित होणार आहेत याचाही विशेष आनंद होतोय.

स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्यासाठी समजून घेण्याचा, अनुभवण्याचा, विचार करून कृती करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे 'राष्ट्रीय एकात्मता' आहे असं मला वाटतं.

आपल्या देशाचा इतिहास, भूगोल, तेथील माणसं, त्यांची जीवनशैली, त्यांची संस्कृती, त्यांचे पिढीजात शहाणपण, त्यांचे प्रश्न यांचा परिचय करून घेणं, त्याविषयी आपल्या मनामध्ये आस्था निर्माण होणं, त्याविषयी आपलेपणा, आपुलकी वाटणं ही राष्ट्रीय एकात्मतेसाठीची पहिली पायरी आहे असं मला वाटतं.

त्यासाठी मातृभूमी परिचय सहली, देशाच्या विविध भागांमध्ये अभ्यास सहली व अभ्यासदौरे, मैत्री अभियाने, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्ये, ज्ञानसेतू सारखे प्रकल्प यांमध्ये सहभागी होणं, भारतातल्या विविध भागांमधील व्यक्तींशी संवाद-मैत्री वाढणं, तेथील लोकसंस्कृतीचा आस्वाद घेणं, तेथील भाषा समजून घेण्याचा, शिकण्याचा प्रयत्न करणं, तेथील कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था, संघटना, चळवळी यांचा अभ्यास करणं इ. गोष्टी करता येतील. भारतामधील विविधतेतील एकता शोधण्यापेक्षा, एकतेची विविध रूपे कशी आहेत हे पाहात गेलो की अनेक गोष्टी आपल्याला, आपल्याशी जोडणाऱ्या वाटायला लागतील. त्यासाठी मुद्दाम वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत.

यापुढची पायरी अर्थातच एकात्मतेला पुष्टी देणाऱ्या व छेद देणाऱ्या घटकांचा अभ्यास करणं. त्यासाठी भारताच्या विविध भागातील प्राचीन व अर्वाचीन इतिहासापासून वर्तमानाचा व भविष्यकालीन इच्छा-आकांक्षा, स्वप्न-समस्या यांचाही अभ्यास करावा लागेल. त्यातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी लागेल. विविध विचारांमधील समान धागे जोडत जावं लागेल.

विविध प्रकारची विषमता ही या एकात्मतेला छेद देणारी महत्त्वाची गोष्ट आहे असं मला वाटतं. मग ती शिक्षणातली असो की संधींची असो किंवा रोजगाराशी, आर्थिक सुबत्तेशी निगडित असो किंवा भौतिक विकास, जीवनमान यांच्याशी संबंधित असो. ही विषमता समजून घेणं, त्यामागील कारणांचा अभ्यास करून ती दूर करण्यासाठी कृती कार्यक्रम योजणं, दीर्घकालीन–सातत्यपूर्ण, कल्पक संघटित प्रयत्नांची त्याला जोड देणं, असे प्रयत्न करणाऱ्या विविध संस्था–संघटनांमध्ये समन्वयाची भूमिका घेणं हेही आपल्याला करायला हवं आहे.

शिक्षण चालू असतानाच यासाठी ठरवून वेळ काढणं आणि शिक्षणानंतर काही महिने, वर्षं या कामासाठी वेळ देण्याचा संकल्प करणं अशी सुरुवात करता येईल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये या प्रक्रियेला वेग यावा यासाठी युवोन्मेषचा हा ‘राष्ट्रीय एकात्मता विशेषांक’ नक्कीच बळ देईल, विचारांना दिशा देईल आणि कृतीरूप प्रतिसाद देण्याची प्रेरणा देईल असा मला विश्वास वाटतो.

ज्ञानसेतू प्रकल्पाच्या प्रमुख पूर्वाताई, प्रकल्पातील कार्यकर्ता आशुतोष भुजबळ व नेतृत्व संवर्धन केंद्रातील सौगंधदादा यांच्या पुढाकारातून हा अंक साकार होतोय त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक! सर्व लेखकांना मनापासून धन्यवाद.

क्रमश: तीन टप्प्यात ई–माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहोचणाऱ्या युवोन्मेषेच्या ‘राष्ट्रीय एकात्मता विशेषांका’चे तुम्ही डोळसपणे वाचन कराल व त्यावर विचार, कृतीतून प्रतिसाद द्याल असा विश्वास वाटतो.

‘रूप पालटू देशाचे’ या कार्यात आपण सगळेच सहभागी होऊ या! अनेकानेक शुभेच्छांसह....

**सस्नेह तुमचा,**



**महेन्द्र सेठिया**

# Education - The Pathway to Leadership and National Integration



**One cannot forget the immense potential possessed by education. The spirit of national integration does not come overnight, it has to be imbibed into the minds of today's students who would go on to become citizens of tomorrow. This has to start from home, and further extrapolate through school curriculum. The fundamental value of fraternity enshrined in the preamble to our constitution shall then be recognized in its true letter and spirit.**

We have come across multiple news discussions, debates, articles about the curse of "brain drain". Also, the problem of regionalism and ethnic conflicts is nothing new to our country. Why does this occur? Let's attempt to break it down and make it simpler to understand.

We hear names such as Sundar Pichai (CEO, Google LLC), Satya Nadella(CEO, Microsoft Inc.) etc. on a regular basis. Our chest swells with a unique sense of pride, and we assert that be it NASA, Google or any other tech giant, the majority of

them are run by Indians. This is certainly an overstatement, but one cannot deny the fact that a big chunk of the best of our brains have been leaving the country since the past few decades with an intention to find a better life, opportunities and a higher standard of living.

Be it brain drain, corruption, poverty, unemployment, discrimination based on region/ethnicity, sub-standard politics or an inefficient bureaucracy, the root cause of it all lies in the education(both, system and curriculum) of our country. Though the Constitution enlists elementary education as a subject in the State list, that is, only the state legislature is empowered to frame laws therein, a holistic picture of the country's education is quite the same in every state.

Often while interacting with school students it is observed that when asked why to get educated and receive higher education, the quickest and most rampant answer is "to get a high paying job". Nothing wrong with bearing this intention in mind, but what lies underneath is problematic, and the most probable root of the larger problems. How is that? Well, there is a huge difference between aspiring to "get a job" and "build a career". I could be having a job, yet not making a career out of it, or in spite of making a career, not be happy with what I achieve. This happens because of a phenomenon called "rat race".

After the economic reforms of 1991 set

the IT industry booming, there was a huge influx of students into the engineering field, a trend which has been receding in the past couple of years. The problem associated with this phenomenon is that it is focused upon creating 'job seekers' and nothing beyond it. Be it the school education which excessively emphasizes on rote learning, or the exact same pattern which is carried forward upto the Master's degree level, the whole idea is to create a pool of job seeking individuals. It does not motivate the students to keep aiming higher and enhancing their skills with time.

There have been steps taken by the Government (Make in India, Startup India, Stand up India, MUDRA) aimed at increasing the base of manufacturers and entrepreneurs in the country. Be it any of these two, they are essentially leaders. Leading a specific kind of human resource into effective utilisation of the available factors of production and creating a gradually growing business or businesses is what an ideal leader is expected to do as far as an industrial leader is considered.



When it comes to leadership in general, the idea is not only to be a good leader but also create followers who would be as efficient as the leader. They should be able to take initiative and lead from the front if and when required. This is what one might call "servant leadership".

Now comes the most challenging part-how? Well, some key changes in the education system, the syllabus taught and the pattern in which it is imparted are inevitable. To start with, imbibing critical thinking and analytical skills in the students from an early age is necessary. This can be achieved by including practical knowledge oriented modules in the curriculum-like model-based activities to understand various scientific phenomena and understanding why they happen. If one knows the why, then 'how' and 'how to apply' questions are automatically answered. The curriculum must also include learning of at least one Indian language other than Hindi and the regional language, for eg. Students from Karnataka may be taught Gujarati or Dogri, and vice versa. Field trips and exchange programs where groups of students travel to another state and get acquainted with the culture, traditions and festivals of a region can also be devised. These activities will invoke curiosity among students and provoke them to obtain deeper knowledge about various regions of the country. This will ensure the feeling of oneness-a fundamental principle



of national integration.

Apart from this, an essential move must be to increase the weightage of subjects such as 'economics' and 'civics', both of which are important irrespective of what field or profession one belongs to. To run a household in a better manner, economics is needed and to know who is fit to run the country, understanding how the system works is necessary. Merely increasing the weightage is not sufficient, activities such as Mock Parliament, Mock Government can help students to become better and more conscious voters. We live in a democracy where the political leaders and bureaucracy hold the offices with highest decision making powers. It is said that "People get the leaders they deserve".

The system is plagued with various ills-corruption, misuse of power, indecisiveness and so on. If these ills are to be cured, one must focus on creating conscious, active and responsible citizens. Only then can there be better leaders, since today's followers become tomorrow's

leaders. A set of good leaders is bound to bring about a transformation ensuring a nation which thrives on rationality, scientific temperament and is well integrated.

***

**- Varun Kulkarni**

Here is a Photo journey of Gyan Setu volunteers in different states. Click on the link to experience a virtual tour of these states.

**राष्ट्रवाद नव्हे राष्ट्रयोग**

राष्ट्रीय एकात्मता ही कुठल्या वैचारिक वादाचा विषय नाही तर भविष्याकडे पाहत नवा मनुष्य आणि राष्ट्र घडविणाऱ्या जीवनपद्धतीचा प्रयोग आहे. त्यासाठी अध्यात्मप्रधान हिंदुत्व आणि विज्ञान दृष्टीवर आधारित व्यवहार यांचे नव्या युगातील स्वरूप मांडावे लागेल. कृषिप्रधान भारत समोर ठेऊन गांधी, विनोबा यांनी मांडलेले अर्थकारणाचे प्रयोग, यंत्रयुगात गेलेल्या, माहितीयुगात जाणाऱ्या आणि नव्या जैवतंत्रज्ञानाकडे जाऊ इच्छिणाऱ्या भारताला लक्षात घेऊन नवे अर्थकारण उभे करावे लागेल. सांस्कृतिक हिंदुत्वामध्ये विज्ञानाच्या बरोबर प्रतिभेला आणि समाज संघटने बरोबर समाजातील नेतृत्वविकसनाला पुढे न्यावे लागेल.

**– ज्ञान प्रबोधिनी राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा भूमिका लेख प्रारूपातून साभार**



Video of Lt. Gen. S. S. Hasabnis PVSM, VSM, ADC (Retd.) Ex Deputy Chief of Army Staff (Planning and Systems)

# ईशान्य भारतातील एक वर्ष...



**राष्ट्रीय एकात्मतेसाठी पूर्वांचल भागातील लोकांशी संवाद साधून, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना शक्य तेवढी मदत करणे अशी प्रबोधिनीची भूमिका राहिली आहे. यासाठीच मणिपूर राज्यात काम करत असलेल्या पुणे प्रबोधिनीच्या युवती कार्यकर्तीचे मनोगत**

ज्ञान प्रबोधिनी सोलापूरच्या मागच्या वर्षीच्या वार्षिक वृत्तात मणिपूर येथे केलेल्या अभ्यास दौऱ्याबद्दल सविस्तर लिहिले होते. जून २०१७ मध्ये आदरणीय स्वर्णलता भिशीकर तथा लताताईंनी (ज्ञान प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या) मला मणिपूरमध्ये काही काळ कार्यासाठी मी जावे असे सुचवले. सर्वांच्या शुभेच्छा घेऊन मी ऑगस्ट २०१७ मध्ये मणिपूरमध्ये दाखल झाले.

पूर्वसीमा विकास प्रतिष्ठान तर्फे मणिपूरच्या तीन विविध भागांत शाळा चालतात. जनजातीय (Tribal) क्षेत्रांमध्ये या शाळा आहेत.

१) उख्रुल जिल्ह्यात खारासो या गावी तांगखुल नागा (Tangkhul Naga) या जनजातीय क्षेत्रात 'ओजा शंकर विद्यालय' २) तमेंगलोंग या मागास जिल्ह्याच्या गावी झिलियांगरोंग जनजाती भागात 'पू. शंकर काणे विद्यालय' ३) कुकी जनजातीय भागात चुराचांदपूर जिल्ह्यामधील गोलोमोल या गावी 'पू. शंकर काणे विद्यालय.'

मी तमेंगलोंग मधील 'पू. शंकर काणे विद्यालय' येथे

जावे असे ठरले होते. तमेंगलोंगमध्ये येताना वाटेतच ईशान्य भारतातील रस्त्यांची जी परिस्थिती आहे तिचा अंदाज आला. मणिपूरमध्ये अजूनही रेल्वे पोहोचलेलीच नाही. स्वातंत्र्यानंतर ७४ वर्षे होऊन गेली तरी एक राज्य असेही आहे जिथे अजून रेल्वे पोहोचलेली नाही. रस्त्यांची परिस्थितीही भयानक! इंफाळ तमेंगलोंगच्या पहिल्याच प्रवासात गाडी चिखलात अशी रुतली की सर्व प्रवाशांना बाहेर पडून धक्का मारावा लागला. बाकी रस्त्यांवरही हाडे खिळखिळी झाली. मणिपूर राज्यात अनेक insurgent groups (दहशतवादी ???) कार्यरत आहेत. त्यामुळे जागोजागी RPF, BSF, Assam Rilles, मणिपूर Rifles च्या छावण्या लागतात. गाडीची झडती होते. विचारपूस केली जाते. कोण आहात? इथे काय करता? कशाला? कुठे? का? इत्यादी. पण महाराष्ट्रातून इथे शाळा चालवायला आलोय असे सांगितले की आदरयुक्त, कौतुकयुक्त प्रतिसाद मिळतो.

प्रवासासाठी आपल्याकडे असते तशी एस.टी. बस सारखी सरकारी व्यवस्था नाही. Sumo Bolero मध्ये माणसे कोंबली जातात. एकूणच प्रवास हा खर्चिक व गैरसोयींनी युक्त आहे.

तमेंगलोंगला पोहोचल्यावर खूप आनंद झाला. सर्व शिक्षकांनी खूप आनंदाने स्वागत केले. शाळेची वास्तू अजून temporary आहे. लाकडावर पत्रे ठोकून येथे आजकाल घरे बनतात, त्याच प्रकारे बनवली आहे. अशीच एक खोली पुढील वर्षासाठी माझे घर असणार होती. तमेंगलोंगच्या शाळेचे प्राचार्य श्री. मायसा पामेई, त्यांची पत्नी श्रीमती अशिमा पामेई यांनी माझ्या खोलीमध्ये छान पडदे, दिवाण, टेबल-खुर्ची, स्वयंपाकासाठी भांडी अशी सर्व व्यवस्था आधीच करून ठेवली होती.

एकूणच येथील लोकांची घरे बाहेरून अगदी साधी वाटली तरी आतून स्वच्छ व टापटीप असतात. उगीचच जास्त सामान सुमान नसते. गरजेच्या, महत्त्वाच्या चार गोष्टी घरात अगदी नीट ठेवलेल्या असतात. घरासमोर स्वच्छ मातीने सारवलेले अंगण असते आणि रंगीबेरंगी फुलांच्या कुंड्या व झाडे लावण्याची जणू



स्पर्धाच असते. जेवणात अनेकविध प्रकारच्या भाज्या व विविध प्रकारचा मांसाहार केला जातो. भात हे मुख्य अन्न, स्वयंपाकाची मुख्य पद्धत म्हणजे उकडून खाणे. ना मसाले, ना तेल. त्यामुळे अतिशय सात्विक आहार. फक्त ताजेच व गरम-गरम अन्न खातात. जेवणाच्या वेळाही अगदी आदर्श. सकाळी लवकर भरपेट जेवण व सूर्यास्तापूर्वी सायंकाळी दुसरे भोजन,

ईशान्य भारतात एकूणच विकासकामे कमीत कमी झाल्याने विकासही कमीच. रोजगार, वीज, रस्ते, मोबाईल टॉवर इ. भौतिक साधनेही इथे अजून नुकतीच पोचत आहेत. विकासाअभावी रोजगारही नाही. मुख्यत्वे शेती हा एकच व्यवसाय. कारखाने, उद्योग इथे नाहीतच. रोजगार नाही त्यामुळे नवीन पिढी रिकामटेकडी. असेही वाचनात आले की सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये मादक पदार्थाच्या तस्करीत अनेक युवक सापडले आहेत. त्यामुळे व्यसनाधीनताही अधिक आहे. सुईवाटे घेतल्या जाणाऱ्या मादक पदार्थांमुळे एड्सचे प्रमाण येथे जास्त आहे.

येथे अलगाववादी, दहशतवादी कारवाया करणारे अनेक गट आहेत. Underground राहून ते काम करतात. Extortion व लोकांकडून 'वार्षिक कर' ते घेतात. लोकही जाचाला व बंदुकीला घाबरून कर भरतात. जणू काही एक Parallel system त्यांनी उभी केली आहे. पण लोकांशी बोलताना लक्षात येते की सामान्य माणूस भीतीने त्यांना कर देतो. त्याची सहानुभूती या गटांशी नाही. सामान्य माणसाला विकास व्हावा, मुलांना उत्तम शिक्षण मिळावे, रोजगार मिळावा असे वाटते. स्वतंत्र 'नागा राष्ट्र पाहिजे' वगैरे नवीन पिढीला वाटत नाही. पण सर्वच काही अंधकार आहे



असे नाही. नवीन पिढी शिकत आहे. विचार करत आहे. राष्ट्राशी समरस होण्यातच आपला विकास आहे हे नवीन पिढीस समजत आहे.

तमेंगलोंगमध्ये पोचल्या पोचल्या दुसऱ्याच दिवशी हिंदी अध्यापनाची जबाबदारी माझ्याकडे आली. मुलांना हिंदी भाषाही नवीन व देवनागरी लिपीही नवीन, त्यामुळे कुठून सुरू करावे हेच कळेना. मुलांना माझी भाषा येईना, मला त्यांची. सगळीच गंमत! मग साभिनय गाणी शिकविणे, त्यातून काही शब्द व उच्चार शिकविणे, अक्षर ओळख, छोट्या वर्गासाठी व मोठ्या वर्गासाठी अक्षरे घोकून घेणे, छोटी हिंदी वाक्ये शिकवणे व वाचनावरच भर दिला. कवितांना चाली लावायला देणे, तक्ते बनवणे, गटकार्य अशा प्रबोधिनीच्या शिक्षणपद्धतीतील काही गोष्टी वापरण्यास सुरुवात केली. राष्ट्रगीत पण पाठ करून घेतले. हिंदी गाण्यावरील नाच बसवला. इ. ६वी ला बिहारी दुकानामध्ये जाऊन वस्तूची हिंदी नावे विचारून तक्ता बनविणे असा कार्यानुभव प्रकल्प दिला. हे सर्व करत असताना खूप शिकायला मिळाले. एकूण ४ महिन्यांत बऱ्याच मुलांना देवनागरीतून वाचन जमायला लागले.

येथे १८% लोकांचे ख्रिश्चनीकरण झालेले आहे. येथे शैक्षणिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे असते. नोव्हेंबरमध्ये परीक्षा संपली की डिसेंबरला सुट्टी असते. नवीन वर्षात अर्थात २०१८ मध्ये माझ्याकडे तिन्ही शाळांची Co-ordinator म्हणून व्यवस्था बघावी, अशी जबाबदारी वाढवण्यात आली. वर्षाच्या सुरुवातीलाच शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. श्रीमती



अलका वैद्य यांनी शैक्षणिक सल्लागार म्हणून कामाची जबाबदारी घेतली. श्रीमती अलका गोडबोले व श्रीमती शिरोप अत्रे याही सल्लागार म्हणून काम बघत आहेत. शिबिर उत्तम रीतीने पार पडले. तिन्ही शाळातील शिक्षक पहिल्यांदाच एकत्र आले होते. नागा, कुकी व मैतेयी यांच्यात अनेक संघर्ष असूनही आमच्या शिबिरात मात्र तिन्ही गटांतील मंडळींमध्ये सौहार्द व एकतेचे वातावरण होते. त्या वेळी अशा एकत्रित उपक्रमांचे व तीन ठिकाणी शाळा असल्याचे काय महत्त्व आहे आपोआपच लक्षात आले. अध्यापन पद्धती, तिन्ही शाळांचे Syllabus standardize करणे, वर्षाचे timetable standardize करणे, अशा महत्त्वाच्या गोष्टींचे निर्णय शिबिरातच पूर्ण झाले.

अनेक सुहृद, हितचिंतक यांच्या मदतीने तिन्ही शाळांची ग्रंथालये समृद्ध करायच्या कामाची जबाबदारी मी व्यक्तिश: उचलली आहे. शाळांना शैक्षणिक साहित्य मिळवून द्यायचे असेही ठरवले आहे. शैक्षणिक सल्लागारांच्या मदतीने शैक्षणिक स्तर उंचावेल अशी आशा आहे. काही सकारात्मक प्रतिक्रिया पालकांकडून येऊ लागल्या आहेत. ज्ञान प्रबोधिनीचा 'ज्ञानसेतू' मणिपूरमध्येही जोडण्याचे काम करणार आहे. मे महिन्यात मणिपुरात ज्ञानसेतू चा पहिला गट येऊन गेला. ईशान्य भारतात ज्ञान प्रबोधिनीचे काम वाढत आहे. या वाढत्या कामातील, सेतुबंधनातील खारीचा वाटा उचलल्याचे अतोनात समाधान मला वाटत आहे.

***

– सौ. वीणा बेडेकर–कदम

Here is a video of a talk given by IAS Hrushikesh Modak sir on challenges and opportunities in Manipur.

**Listen and Answer**

We are sharing a link to a video of Gyan Setu Katta 'Know Our Country' Series. Do watch this video and try to solve a quiz based on it. Let’s see how much you know about the mentioned state!

Gyan Setu Katta : **Know Our Country** Series,
**State - Meghalaya**

Here is an interview of Mr. Pravin Shewale (Vibhag Pracharak - Meghalaya) on Opportunities and Work Experience in Meghalaya

Quiz Link

---

**Jagriti Yatra** (also referred to as JY or Yatra) is a fifteen-day long train journey exploring social entrepreneurship with four hundred and fifty young minds travelling through twelve to fifteen states in India.
Here is an experience of **Om Naik** about Jagriti Yatra.

---

या भागासह ‘युवोन्मेष’चा ‘राष्ट्रीय एकात्मता विशेषांक’ पूर्ण झाला आहे. संपूर्ण अंक पाहण्यासाठी या QR Code वर क्लिक करा.